MHAH160005922014

# निशाणी ७५ खालील आदेश

(दत्तु फापाळे वि. आण्णासाहेब फापाळे)

प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द जाहीर ठराव व वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्ज निशाणी ७५ न्यायप्रविष्ठ करुन विनंती केली आहे की, सदरचे दाव्यात निशाणी ६७ ला वर्णनयादी सोबत काही महत्त्वाचे पब्लीक डॉक्युमेंट जोडलेले आहेत. सदरचे कागदपत्र नजरचुकीने निशाणी देण्याचे राहून गेले आहे. तरी सदरच्या कागदपत्रांना निशाणी देण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर असे म्हणणे दिले आहे की, सार्वजनिक कागदपत्रांना निशाणी देण्यास हरकत नाही.

३. मुळ दावा आणि अर्ज पाहिला. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द जाहीर ठराव व वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादीने निशाणी ६७ सोबत अनुक्रमांक १ ते ६ नुसार ७/१२ उतारे हे सार्वजनिक दस्तऐवज दाखल केले आहेत व सदर दस्तऐवज हे दाव्याच्या निर्णितीकरीता आवश्यक कागदपत्र आहेत. प्रतिवादी यांना सदर दस्तऐवज हे सार्वजनिक दस्तऐवज असल्यामुळे निशाणी देण्यास हरकत नाही. सबब, खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. निशाणी ६७ नुसार अनुक्रमांक १ ते ६ वर दाखल केलेल्या ७/१२ उता–यांना दाव्यातील शेवटच्या निशाणी क्रमांकाच्या पुढील

**आर.सी.एस. १२२/२०१४**

निशाणी क्रमांक देण्यात यावेत.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.01.12 17:04:13 +0530

दिनांक १२.०१.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
**<u>अकोले.</u>**